महा मेट्रो

PUNE METRO

# पुणेमेट्रो च्या कामासाठी नाशिक फाटा जवळ वाहतुकीत बदल

## प्रेस नोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/२८२९/२०१९ पिंपरी चिंचवड शहर दिनांक- २७/१२/२०१९

पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी वाहतुक विभागाचे हद्दीतील खराळवाडी ते नाशिक फाटा दरम्यान मेट्रोचे काम करण्याचे नियोजित केले आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम. व्ही.ए. ०१९६/८७१/सी आर-३७/टीआरए-२,दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पिंपरी चिंचवड शहर खराळवाडी ते नाशिकफाटा दरम्यान मुंबईकडे जाणा-या व पुण्याकडे जाणा-या रोडवर खालीलप्रमाणे तात्पुरते बदल करण्यात येत आहेत.

- दि.३०/१२/२०१९ रोजी सकाळी ००.०० वा ते दिनांक ३१/१२/२०१९ रोजी १४.०० वा पर्यंत एच ए फॅक्टरी समोर पीलर नं ३२४,३२५,३२६ तयार झालेल्या मेट्रोचे कामासाठी मुंबईकडुन पुण्याकडे येणारी वाहतुक खराळवाडी येथे वळवुन मुंबईकडुन पुण्याकडे येणा-या ग्रेडसेपरेटरमधुन नाशिक फाटयापर्यंत वळविण्यात येणार आहे. खराळवाडी येथुन एच ए फॅक्टरी वसाहतीकडे जाणा-या लोकांना जाऊन देण्यात येणार आहे. एच ए फॅक्टरी अंडरपास याचे बाजुचा नेहरुनगरकडे जाण्यास खुला राहिल. सदर रोडचे कडेला असलेला इंडीयन ऑईल पेट्रोल पंप पासुन पुणेकडे जाणेस पुर्णपणे बंद राहील.
- तसेच भोसरी विभागाचे हद्दीत दि.०२/०१/२०२० रोजी सकाळी ०७.०० वा ते दिनांक ०४/०१/२०२० रोजी सकाळी ०७.०० वा पर्यंत एच ए फॅक्टरी समोर पीलर नं ३२४,३२५,३२६ तयार झालेल्या मेट्रोचे कामासाती पुण्याकडुन मुंबईकडे जाणारी वाहतुक नाशिक फाटा चौक येथे मुंबईकडुन पुणेकडे येणारी ग्रेडसेपरेटरमधुन उलट दिशेने खराळवाडी पर्यंत नेऊन पुन्हा डावीकडे वळवुन मुंबईकडे जाणारे ग्रेडसेपरेटर व सर्व्हिस रोडने वळविण्यात येणार आहे.पुण्याकडून मुंबईकडे जाणारा सर्व्हीस रस्ता,बी.आर.टी. रस्ता, वल्लभनगर अंडरपास ते खराळवाडी पर्यंत वाहतूक पूर्णपणे बंद राहील.

  तरी वरील वाहतुक बदलाबाबत वाहतूक कर्मचारी व वॉर्डन यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

Shiremath

(सुधीर हिरेमठ)भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक
पिंपरी चिंचवड शहर

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक पिंपरी/भोसरी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार/ प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करुन त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टासह दोन दिवसात सादर करावी.

४) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड पुणे

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.